नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २७/०९/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

## मोटार पंप चोरी चा गुन्हा उघड
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर जिल्हा ग्रामीण ची कार्यवाही :—

स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणचे पथक दिनांक २६.०९.२०२२ रोजी रामटेक उपविभागात अवैध धंदयांवर आढा घालणेकामी पोस्टे रामटेक ते मौदा रोड वरील नगरधन शिवारातील मम्मु बार एन्ड रेस्टॉरंट समोरून पेट्रोलींग करीत असता रामटेक रोड नी रामटेक कडे एक आकाशी रंगाचा शर्ट घातलेला पिवळया रंगाचे मोटर सायकलवर ज्याला मागुन व समोरून नंबर प्लेट दिसुन न आल्याने व मोटर सायकल ला पाण्याची मोटर सायकल बांधुन जातांनी दिसल्यावरून त्यास लगेच स्टाफच्या मदतीने थांबुन त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव **विजयकुमार कंधीराम सरयाम वय ३२ वर्षे, रा. पतरई पोष्ट परासिया तह. लखनादोन जिल्हा सिवनी मध्यप्रदेश** असे सांगितल्यावरून त्यास वाहनात बांधलेली पाण्याची मोटर पंपाबाबत विचारणा केली असता तो उडवा उडवी चे उत्तर देत असता त्यास विश्वासात घेवुन सखोल विचारपुस केली असता त्यांने सदरची पाण्याची मोटर पंप ही तो राहत असलेल्या सोना ॲग्रोटेक राइस मिल च्या आवारातुन चोरी केली असुन तो पाण्याची मोटर पंप त्याचे गावी लखनादोन मध्यप्रदेश येथे घेवुन जात असल्याचे सांगितल्यावरून पोस्टे रामटेक येथे पाण्याची मोटार पंप चोरी झाल्याबाबत फोनद्वारे विचारणा केली असता **पोस्टे रामटेक येथे अप.क्र. ५६१/२२ कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद** असल्याची माहिती मिळाल्याने त्याचे ताब्यातुन **निळया केसरी रंगाची लोखंडी किलोलस्कर कंपनीची पाण्याची मोटर पंप कि. १३,०००/— रू. व गुन्हयात वापरलेली बिनानंबरी पिवळया रंगाची याम्हा कंपनीची फेझर मोटर सायकल किं. ५०,०००/— रू असा एकुण ६३,०००/— रू** चा मुद्देमला जप्त करून पुढील कार्यवाही कामी पोस्टे रामटेक यांचे ताब्यात देण्यात आला.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, पोलीस नाईक रोहण डाखोरे, विपीन गायधने, अमोल वाघ, अमोल कुथे यांचे पथकाने पार पाडली.



## अवैध कोळसा चोरीवर स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची धडक कारवाई
## ५,०४,०००/— रू चा मुद्देमाल जप्त

नागपूर ग्रामीण जिल्हयात कोळसा चोरीचे प्रमाण वाढत असल्याने मा. पोलीस अधीक्षक विजयकुमार मगर यांनी सदर घटनेवर आळा घालण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखा ना. ग्रा. चे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे यांना आदेश दिल्याने, पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे यांनी ही बाब अत्यंत गांभिर्याने घेवुन आपले अधिनस्त असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना आदेशित करून पथके तयार केली. दिनांक २६.०९.२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक कन्हान उपविभागात पेट्रोलींग करीत असता गुप्त माहीतगाराकडून खात्रीशीर माहीती मिळाली की, आरोपी नामे—क्र. १ फारूक अबदुल्ला, वय २६ वर्ष, रा. कन्हान, २. राजन भिसे, वय ४७ वर्ष, रा. सत्रापुर कन्हान व ३) क्रिष्णा खडसे, वय २२ वर्ष, रा. सत्रापुर कन्हान यांनी वेगवेगळया ठिकाणाहून कोळसा चोरून ठेवला आहे. अशा प्राप्त खबरेची पळताळणी केली असता, डब्लुसीएल येथील पथक यांचे सह रेड करून कार्यावाही दरम्यान पो.स्टे. कन्हान येथे दाखल अप क्र. ५५६/२२ कलम ३७९ भादवी मधील चोरी गेलेला कोळसा गहुहिवरा रोड येथून २५ टन कोळसा, अप क्र. ५५४/२२ कलम ३७९ भादवी मधील चोरी गेलेला कोळसा एमजी नगर येथून १२ टन कोळसा, अप क्र. ५५५/२२ कलम ३७९ भादवी मधील चोरी गेलेला कोळसा खंडेलवाल कंपनी ऐरीया येथून १२ टन कोळसा असा एकुण ५० टन कोळसा आणि २ इलेट्रीक वायर कि. ५,०४,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक अनिल राउत, पोलीस हवालदार विनोद काळे, नाना राउत, भगत, पोलीस नाईक शैलेश, प्रणय, विरेन्द्र नरड, चापोना शुक्ला यांचे पथकाने पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**